अपर पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग,
सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०.
दिनांक २४/०३/२०२३

## प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | १३/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | लोकसेवक श्री विजय शिवदास माने, वय ५३ वर्षे, धंदा–नोकरी (पद –प्रभारी पोलीस निरीक्षक, नेमणूक– धारावी पोलीस ठाणे, मुंबई.) |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/–किंवा आयफोन मोबाईल |
| ६ | तडजोडीअंती लाचेची मागणी केलेली रक्कम | रु. ४०,०००/– |
| ७ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/– |
| ८ | हस्तगत लाचेची रक्कम | रु. ४०,०००/– |
| ९ | थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार व त्यांची आई यांचेविरुध्द धारावी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १२८६/२०२२, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८ व ३४ भादंवि अन्वये दि. १६/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांना नमूद गुन्हयात दि. १६/११/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती. सध्या ते जामीनावर मुक्त आहेत.<br>सदर गुन्हयाचे तपासाचे दरम्यान यातील तक्रारदार वर नमूद आलोसे यांना भेटला असता वर नमूद आलोसे यांनी तक्रारदार यांच्यावर दाखल वर नमूद गुन्हयातील कलम कमी करुन देतो असे सांगून प्रथम रु. १,००,०००/–किंवा आयफोन मोबाईलची लाचेच्या स्वरुपात मागणी केली.<br>तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. २३/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येऊन लेखी तक्रारअर्ज दिला.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने आज दि. २४/०३/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू. ४०,०००/–इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br>त्यानुसार आज दि.२४/०३/२०२३ सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रू. ४०,०००/– तक्रारदार यांच्याकडून स्विकारली असता आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी :– श्री. विजय पाटील सो., अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग

24/3/23

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट–acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in, फेसबुक:www.facebook.com Maharashtra ACB.
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,मोबाईलॲप :www.acbmaharashtra.net.

Scanned with CamScanner